



Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : २८८ वा | शुक्रवार दि. १७ जानेवारी २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# सरकार टोल कर संकलनाबातीत नवी योजना आखण्याच्या तयारीत, खासगी वाहनांसाठी पासेसचा विचार-नितीन गडकरी

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी टोल टॅक्सबाबत सरकार नवनवीन नियोजन करत असल्याचे सांगत, यानंतर लोकांना थांबून टोल भरावा लागणार नाही. आता खासगी वाहनांना पास देण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे. राष्ट्रीय महामार्गावरील खासगी वाहनांसाठी मासिक आणि वार्षिक टोल पास घेण्याचा सरकार विचार करत आहे. असेही ते म्हणाले. बुधवारी बॅरियर लेस टोलिंग या विषयावरील गोलमेज परिषदेत बोलताना ते म्हणाले की, ७४ टक्के टोल महसूल व्यावसायिक वाहनांमधून येतो. राष्ट्रीय महामार्गावरील एकूण संकलनात खासगी वाहनांचा वाटा केवळ २६ टक्के आहे. आम्ही खाजगी वाहनांसाठी मासिक किंवा वार्षिक पास सुरू करण्याचा विचार करत आहोत. एकूण टोलवसुलीत खासगी वाहनांचा वाटा केवळ २६ टक्के आहे, त्यामुळे सरकारचे कोणतेही नुकसान होणार नाही, असेही ते म्हणाले. वाहतूक कोंडी कमी करणे आणि अचूक अंतराच्या आधारे महामार्गावरील प्रवासासाठी शुल्क आकारणे हा यामागचा उद्देश आहे.रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने सुरुवातीला अतिरिक्त वैशिष्ट्य म्हणून राष्ट्रीय महामार्गांवर, फास्टॅगसह अखंड ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टम () आधारित, टोल संकलन प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. ते म्हणाले की ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टम () आधारित टोल वसुली यंत्रणा, सध्याच्या टोल वसुली प्रणालीपेक्षा चांगली असेल. असे गडकरी म्हणाले. गेल्या वर्षी जुलैमध्ये, गडकरी म्हणाले होते की  आधारित युजर शुल्क संकलन प्रणालीचा प्रायोगिक तत्वावरील प्रयोग कर्नाटकातील राष्ट्रीय महामार्ग ()-२७५ च्या बेंगळुरू-म्हैसूर विभागावर आणि -७०९ च्या पानिपत-हिसार विभागावर करण्यात आला आहे. २०१८-१९ या आर्थिक वर्षात टोल प्लाझांवर वाहनांसाठी सरासरी ८ मिनिटे प्रतीक्षा करावी लागली. २०२०-२१ आणि २०२१-२२ या आर्थिक वर्षांमध्ये फास्टॅग लागू केल्यामुळे, गाड्यांची सरासरी वेळ ४७ सेकंदांपर्यंत कमी झाली आहे. विशेषत: दाट लोकवस्तीच्या शहरांमध्ये प्रतीक्षा कालावधीत लक्षणीय सुधारणा झाली आहे. तरीही, गर्दीच्या वेळेत टोल प्लाझावर काही विलंब होतो.




## बाजार भावा पेक्षा कमी किमती मध्ये शेळ्या विकत असल्याने संशय आल्याने अडकले चोरटे...

**जनसंचलन/ डोणगाव**

डोणगाव येथे गुरांचा बाजार प्रसिद्ध असल्याने व शेळी वर्गीय पशुची विक्री जोरात होते त्याचा फायदा घेण्यासाठी डोणगाव येथील आठवडी बाजार हे चोरटे आले होते त्यांनी अकोला जिल्हातील बाळापूर व बुलढाणा जिल्ह्यातील हिवरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत चोरी करून हया शेळ्या आणल्या होत्या मात्र त्या कमी किमतीत विकत असल्याने बाजारातील व्यापाऱ्यांना संशय आला त्यांनी डोणगाव पोलिसांना पांचारण करीत चोरट्याना पकडले.

डोणगाव येथील पशु बाजार खूप मोठा असतो आठवडी बाजारांमध्ये शेतकरी व व्यापारी आपले गुरे आणतात त्यामध्ये सर्व प्रकार चे गुरे ढोरे विक्रीकरिता व खरेदी करिता येतात याच गोष्टीचा फायदा घेत १५ जानेवारीच्या सकाळी ९ वाजता दरम्यान अकोला येथून टाटा एस वाहन क्र. २६ १७४७ मध्ये काही चोरट्यांनी सात शेळ्या विक्रीकरिता आणल्या होत्या त्या मूळ किमतीपेक्षा अर्धा किमतीत विकत असल्यामुळे नागरिकांनी तत्काळ पोलीस स्टेशनला कॉल केला. माहिती मिळताच डोणगावचे ठाणेदार अमरनाथ नागरे यांनी कॉन्स्टेबल हर्ष सहगल व कॉन्स्टेबल चव्हाण यांना तिथे रवाना केले पोलिसांची खाकी बघताच चोरट्यांनी तिथून पळ काढला वाहन ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला आणले व चोरट्यांचा पाठलाग करून गौरव कैलास शित्रे (२२) , कृष्णा केशव इंगळे (१९) , आदित्य सुनील इंगळे (२२), गनेश दत्ता वाठोरे(१७) वरील आरोपींना ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी विचारपूस केली असता त्यांनी उडवा उडवी चे उत्तरे देत होते परंतु पोलिसांनी खाक्या दाखवतात त्यांनी पशुधन चोरीची असल्याचे उघड केले.

तेव्हा डोणगाव पोलिसांनी अकोला जिल्हातील बाळापूर पोलिसांना बोलावले असता या सात शेळ्या पैकी ५ शेळ्या त्यांच्या पोलीस स्टेशन हद्दी मधील असल्याचे त्यानी सांगितले व ओळख पटवली तर खामगांव तालुक्यातील हिवरखेड पोलीस स्टेशनं अंतर्गत २ शेळ्याची ओळख पटवली हे चोरट्याना अकोला जिल्हातील बाळापूर पोलिसांनी ताब्यात घेतले व मुद्देमाल सह आरोपीना घेऊन गेले.

## शिवजयंती उत्सव समितीची १८ जानेवारी रोजी होणार बैठक

**जनसंचलन/बुलढाणा**

छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीची १९ फेब्रुवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या सार्वजनिक शिवजयंती सोहळ्याच्या दृष्टीने १८ जानेवारी रोजी तातडीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. शासकीय विश्रामगृहामध्ये सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास ही बैठक होईल. बुलढाणा येथे २०१६ पासून छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या माध्यमातून शिवजयंती साजरी केली जाते. पुढे हीच परंपरा राज्यात अनेक ठिकाणी सुरू झाली. त्यामुळे बुलढाण्यातील सार्वजनिक शिवजयंती सोहळा समितीचे एक महत्त्व आहे. २०२४ मध्ये सार्वजनिक समितीचे



अध्यक्षपद आ. संजय गायकवाड यांनी भूषविले होते. आता १९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीची लगबग सुरू झाली असून, त्याच अनुषंगाने पुढील अध्यक्ष निवडण्यासाठी व मागील हिशेब सादर करण्यासाठी शनिवार १८ जानेवारी रोजी ही बैठक होत आहे. या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राज्य क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा

जनसंचलन/ बुलढाणा

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाअंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद बुलढाणा यांचे संयुक्त विद्यमान ऑलम्पिक वीर कुस्तीगीर स्व.खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त दुसरा राज्य क्रीडा दिन दि. १५ जानेवारी रोजी भारत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, बुलढाणा येथे साजरा करण्यात आला. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी आणि प्राविण्य प्राप्त खेळाडूंचा मान्यवरांचे शुभहस्ते गुलाब पुष्प मोमेंटो प्रदान करुन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष बुलढाणा जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष ठाकरे, प्रमुख अतिथी प्राचार्य इंगळे मॅडम, भारत विद्यालय चे वरिष्ठ शिक्षक संजय देवल शिवशंकर विद्यालय भरोसा तालुका चिखली येथील शारीरिक शिक्षण शिक्षक तथा चिखलीचे क्रीडा स्पर्धा संयोजक लांडकर सर, तालुका क्रीडा अधिकारी मेहकर मिलिंद काटोलकर, इत्यादी उपस्थित होते. सर्वप्रथम व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांचे शुभ हस्ते दिप प्रज्वलित करून ऑलिंपिक वीर कुस्तीपटू स्व.खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन तथा हारार्पण करण्यात आले. तद्नंतर यावेळी व्यासपीठावर उपस्थित जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी उपस्थित मान्यवरांची खाशाबा जाधव यांच्या जीवनावरील माहिती पुस्तक, गुलाब पुष्प आणि मोमेन्टो प्रदान करुन सन्मानीत केले. तसेच आपल्या प्रास्ताविकपर मार्गदर्शनामध्ये स्व. खाशाबा जाधव यांचा जीवन परिचय करून दिला. राज्य क्रीडा दिनाच्या आयोजना मागील शासनाचा नेमका कोणता उद्देश आहे याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. यावेळी व्यासपीठावर उपस्थित भारत विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक संजय देवल यांनी सुद्धा खेळाडूंना अमुल्य असे मार्गदर्शन केले. यावेळी जिल्ह्यातील विविध एकविध खेळ संघटनेचे पदाधिकारी, विविध शैक्षणिक संस्थेतील शारीरिक शिक्षण शिक्षक, क्रीडा मार्गदर्शक, पालक, भारत विद्यालयातील विविध शिक्षक आणि बहुसंख्य राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय खेळाडू उपस्थित होते. यावेळी पाच आर्चरी, कूडो, या क्रीडा प्रकारामध्ये आंतरराष्ट्रीय प्रकारच्या क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या खेळाडूंचा मान्यवरांच्या शुभहस्ते गौरव करण्यात आला. तसेच योगा, आर्चरी, बॅडमिंटन, फुटबॉल, रोलबॉल, कुराश, बॉक्सींग ,पिंचॅक सिलेट, तेंग सु डो, रायफल शुटींग, ड्रॉप रोबॉल, इत्यादी खेळांमध्ये राज्याचे प्रतिनिधीत्व केलेल्या जवळपास ४६ राष्ट्रीय खेळाडूंचा मान्यवरांच्या शुभहस्ते मोमेंटो गुलाब पुष्प देऊन गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित क्रीडा मार्गदर्शक यांचा सुद्धा मान्यवरांच्या शुभहस्ते मोमेन्टो आणि गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज श्रीवास यांनी तर आभार प्रदर्शन रविंद्र धारपवार क्रीडा अधिकारी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी करिता, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथील संदीप केळे, डॉ. जिवन मोहोड यांनी तसेच जिल्हा क्रीडा संकुलातील मानद कर्मचारी विनोद गायकवाड, भीमराव पवार, कृष्णा नरोटे, सुहास राऊत, इत्यादींनी अथक परिश्रम घेतले. त्याचप्रमाणे बुलढाणा येथील सहकार विद्या मंदिर येथे सुद्धा आज दि.१५ जानेवारी २०२५ रोजी ऑलम्पिक वीर कुस्तीगीर स्व.खाशाबा जाधव यांचे जयंती दिनाचे औचित्य साधून, राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात आला. सहकार महर्षी भास्करराव शिंगणे विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, चौथा तालुका जिल्हा बुलढाणा येथे सुद्धा रॅली तसेच तालुका क्रीडा संकुल, मलकापूर येथे खेळाडूंचा सत्कार व क्रीडाविषयक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. शिवाजी विद्यालय बुलढाणा येथे सुद्धा आज दि. १५ जानेवारी २०२५ रोजी राज्य क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी बि. एस. महानकर यांनी कळविले आहे.

# जिल्ह्यातील उमेदवारांना इस्त्राईल येथे रोजगाराची संधी !

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत घरगुती सहाय्यक पदासाठी भरती

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत जिल्ह्यातील पुरुष व स्त्री उमेदवारांना, इस्त्राईल येथे घरगुती सहायक या कामासाठी रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. इच्छुकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बुलढाणा चे सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे. इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असणाऱ्या २५ ते ४५ वयोगटाचे उमेदवार या संधीचा लाभ घेण्यास पात्र आहेत. सोबतच उमेदवारांकडे घरगुती सहायक सेवांसाठी निपुण/पारंगत, भारतातील सक्षम प्राधिकरणाव्दारे नियामक मान्यताप्राप्त असलेले व किमान ९९० तासांचा कोर्स पूर्ण केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. भारतीय प्राधिकरणाव्दारे प्रदान केलेल्या मिडवायफरीमधील प्रशिक्षण, संबंधित भारतीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली किंवा नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स असिस्टंट मधील प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक, तसेच जीडीए/एएनएम/ जीएनएम/बीएससी नर्सिंग/ पोस्ट बीएससी नर्सिंगची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे. घरगुती सहायक पदाचे नाव असून त्यास किमान पात्रता १०वी उत्तीर्ण, अनुभव, डिप्लोमा आणि प्रमाणपत्र काळजीवाहक सेवा प्रदान करण्यासाठी पात्र आणि भारतातील सक्षम नियामक प्राधिकरणाकडून जारी केलेले प्रमाणपत्रधारक असावा, जो ९९० तासांच्या ( सहित) मान्यताप्राप्त किंवा संबंधित भारतीय अधिकाऱ्यांद्वारे पर्यवेक्षण केलेला, किंवा पूर्णत्व सिद्ध करणारा डिप्लोमा यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे दाखवणारे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स सहाय्यक, किंवा प्रसूतीशास्त्र प्रशिक्षण पूर्ण केलेला, ज्याच्याकडे संबंधित भारतीय प्राधिकरणांकडून डिप्लोमा मान्यताप्राप्त आहे. जीडीए/ एएनएम/जीएनएम/बीएससी नर्सींग/ पोस्ट बीएससी नर्सींग, इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक वयोमर्यादा २५ ते ४५ वर्षे, पुरुष/ स्त्री उमेदवार पात्र. उंची/वजन - किमान ५ फूट / ४५ किलो किंवा अधिक. पासपोर्ट वैधता किमान ३ वर्षे. इतर आवश्यकता उमेदवाराने पूर्वी इस्त्राईलमध्ये काम केलेले नसावे. त्याचा/तिचा जोडीदार, पालक किंवा मुले इस्त्राईलमध्ये सध्या काम करत असू नयेत किंवा इस्त्राईल रहिवासी नसावा. इस्त्राईल येथे नोकरी इच्छुक उमेदवारांनी .. या संकेतस्थळावर नोंदणी करून परदेशातील रोजगार संधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय इमारत, तळमजला, बुलढाणा येथे कार्यालयीन वेळेत अथवा कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांक ०७२६२-२४२३४२ संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र चे सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे.

# स्त्री सक्षमीकरणासाठी जिजाऊंचे विचार प्रज्वलित करण्याची गरज - डॉ.अविनाश असनारे


वृत्तसंस्था/अमरावती

समाज समृद्ध बनविण्यासाठी अनेक स्त्रियांनी आपले कर्तृत्व पणाला लावले. त्यात संत परंपरेतील स्त्रिया जशा आहेत, तशाच ऐतिहासिक परंपरेतील लढाऊ स्त्रियाही होऊन गेल्या. त्यामध्ये राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँ साहेब यांचे नाव अग्रक्रमाने घेतल्या जाते. स्वराज्य निर्मितीचा दूरदृष्टीकोन ठेवून शिवरायांच्या मनात माणुसकी, नैतिकतेचे संस्कार करतानाच संकटावर व प्रतिकुल परिस्थितीवर मात करून जीवनात वाटचाल करण्याचे धैर्यही त्यांच्या मनात निर्माण करण्याचे कौशल्य माँ साहेब जिजाऊ यांनी विकसित केले. अश्याच प्रकारचे कौशल्य, धाडस, नेतृत्व आणि विकासदृष्टी आजच्याही महिलांमध्ये निर्माण व्हावी, यासाठी जिजाऊंचे आदर्श विचार समाजात प्रज्वलित करण्याची गरज असल्याचे मत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी व्यक्त केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या एम.ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा व व्यवस्थापन या अभ्यासक्रमाच्यावतीने माँ साहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अमरावती शहराच्या आमदार सौ. सुलभाताई खोडके, सुप्रसिद्ध निवेदिका क्षिप्राताई मानकर, विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील आदी उपस्थित होते.

डॉ. असनारे पुढे म्हणाले, आजच्या स्त्रिया प्रत्येक क्षेत्रामध्ये अस्तित्व निर्माण करून स्वतःची ओळख निर्माण करीत आहे. शिक्षण, क्रीडा, संगीत, राजकारण आणि समाजकारणात पुरुषांच्या बरोबरीने नावलौकिक करीत आहे. ज्या प्रमाणे




जिजाऊंनी आपल्या संस्कारातून स्वराज्य निर्मितीसाठी शिवरायांना प्रोत्साहित करून एक आदर्श निर्माण केला, त्याचप्रमाणे समाजातील प्रत्येक स्त्रियांनी आपले नैतिक कर्तव्य म्हणून आपल्या मुलावर संस्कारमय मूल्ये बिंबवून त्यांच्यामध्ये मानवी संवेदना निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, अशी आशाही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश डॉ. मंजुषा बारबुध्दे यांनी स्पष्ट केला. सूत्रसंचालन डॉ. अश्विनी राऊत यांनी तर आभार प्रा. वृषाली जवंजाळ यांनी मानले.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाण्यात आज निर्यातदारांसाठी कार्यशाळा

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा उद्योग केंद्रामार्फत आज बुलडाणा अर्बन रेसिडेन्सी क्लब येथे निर्यातदारांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते होणार आहे. जिल्ह्यातील निर्यातदारांनी कार्यशाळेला उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे यांनी केले आहे. निर्यात क्षेत्रात जागरूकता, उद्योजकता आणि शाश्वत आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राच्या पुढाकाराने उद्योग विकास आणि निर्यात आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत अमरावती क्षेत्रा-चे उद्योग सह संचालक निलेश निकम हे महाराष्ट्रातील निर्यात उपक्रमांविषयी माहिती देतील. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील बुलढाणा जिल्ह्यात सूक्ष्म, लघू आणि मध्यम (एमएसएमईएस) उद्योग वाढीची संभाव्यता आणि पुढील वाटचालीविषयी मार्गदर्शन करतील. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे बुलढाणा जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीविषयी माहिती देणार आ-हेत. सहायक संचालक स्नेहल ढोके ह्या केंद्र सरकारच्या निर्यात प्रोत्साहन योजनांची माहिती देतील. कार्यशाळेच्या मध्यातरानंतर सल्लागार अंकीत गुप्ता हे बुलढाणा निर्यात कृती आराखड्याविषयी माहिती देतील. डाक निर्यात केंद्राविषयी अधीक्षक जी.एन. जाधव माहिती देतील. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे कृषी विभागाच्या निर्यात प्रोत्सा-हन योजनेविषयी माहिती देतील. कार्यशाळेच्या अंतिम टप्प्यात प्रश्नोत्तर घेतल्यानंतर समारोप करण्यात येईल. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी निर्यातदार, उद्योजकांनी ://./१५७ या गुगल फॉर्मवर माहिती भरुन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे यांनी केले आहे.

# इ १० वी व १२ वी विद्यार्थ्यांचे ग्रेस गुण अर्ज आपले सरकार पोर्टलवरच ऑनलाईन स्विकारले जाणार

जनसंचलन/ खामगाव

१० वी व १२ वी विद्यार्थ्यांचे ग्रेस गुण अर्ज शासनाच्या आपले सरकार प्रणालीद्वारे केवळ ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्याबाबत क्रीडा आयुक्त सुचित केले आहे. जिल्ह्या-तील सर्व खेळाडू, विद्यार्थी, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपले सरकार पोर्टलवर या वर्षीपासून सवलत गुणांचा अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी केले आहे. दरवर्षीप्रमाणे इयत्ता १० वी व १२ वी च्या खेळाडू विद्यार्थ्यांचे ऑफलाईन अर्ज मागविले जातात. त्या माहितीचे संकलन करुन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाद्वारे परिपुर्ण प्रस्ताव माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळास पाठविले जातात. सन २०२३-२४ पर्यंतची ग्रेस गुण प्रक्रिया काही मानवी उणीवांमुळे हे काम अचुक व दोषरहीत होणे क्लिष्ट होत होती व त्याचा फटका विद्यार्थ्यांना त्यांच्या गुण न मिळण्याने बसत होता. या प्रश्नावर तोडगा आणि सदर सवलत गुण प्रक्रिया निर्दोष करण्यासाठी, या वर्षीपासून म्हणजेच २०२४-२५ यावर्षापासून ग्रेस गुणांसाठी केली जाणारी प्रक्रिया शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्यात आली आहे. तसेच सदर पोर्टलद्वारे सर्व अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडे सादर करण्याची सुविधा निर्माण करुन देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यातील सर्व खेळाडू विद्यार्थी / जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपले सरकार ॲपद्वारे या वर्षीपासून सवलत गुणांचा अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. त्यासंदर्भात कोणताही खेळाडू जिल्हा क्रीडा कार्यालय, बुलढाणा येथे ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करणार नाही व अशा प्रकारचा अर्ज जिल्हा क्रीडा कार्यालय, बुलढाणा यांचेकडून स्विकारल्या जाणार नाही याची नोंद बुलढाणा जिल्ह्यातील सर्व खेळाडू, विद्यार्थी, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी घ्यावी, असे आव-ाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी केले आहे.




# शिक्षण विभागाच्यावतीने आज शैक्षणिक गुणवत्ता संमेलन !

## विद्यार्थ्यांना सुगम पाठशाला साहित्याचे होणार वितरण

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्ह्या-तील शाळेचा, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टिकोणातून बुलढाणा यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक गुणवत्ता संमेलन १७ जानेवारी रोजी सहकार विद्या मंदीर, बुलढाणा येथील सभागृहात होण-ार आहे. या कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण व प्रशिक्षण संस्था बुलडाणाचे प्राचार्य डॉ. जे.ओ.भटकर, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम.मोहन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड हे उपस्थित राहणार आहेत. संमेलनात जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख व शाळे-तील शिक्षक उपस्थित रा-हणार आहेत. तसेच संमेलनात विद्यार्थांच्या सर्वांगीण ज्ञानात वाढ व्हावी व संगीत क्षेत्राचे शिक्षण मिळावे. यासाठी जिल्ह्यात सुगम पाठशाला अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी संगीत साहित्याचे वितरण मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे नियोजन जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथ) बि.आर.खरात व प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# बिहार येथे एकनिष्ठा फाउंडेशनला सेवारत्न पुरस्कार

जनसंचलन/ खामगांव





दरभंगा बिहार येथे दोन दिवसीय राष्ट्रीय रक्तदाता प्रतिनिधी संम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते या संम्मेलनामध्ये भारत देश नेपालसह २१५ संस्थानी सहभाग घेतला होता. सर्वप्रथम शतकवीर रक्तदात्यांच्या हस्ते दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी दिप प्रज्वलन करून. कार्यक्रमाचे थाटात उदघाट झाले या कार्यक्रमाला उपस्थित झालेल्या देशातील सर्व संस्थेचे पदाधिकारी सदस्य यांची कार्यशाळा समर्पण मिथिलाचे राष्ट्रीय महासचिव दिपक कुमार महथा, राष्ट्रीय उपाध्यक्ष उमेश प्रसाद , कोषाध्यक्ष रंजीत श्रीवास्तव , राकेश रंजन यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आली तसेच दिनांक १२ जानेवारी २०२५ ला सांस्कृतिक नृत्याचे प्रसारण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन समर्पण मिथिला संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मृदुल कुमार शुक्ला (वरिष्ठ भाजपा नेता दरभंगा बिहार) यांच्या मार्गदर्शनात रक्तदान शिबिराचे संपन्न झाले या शिबिरात शेकडो रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेचे दर्शन घडविले एकनिष्ठा गौ - सेवा रक्तसेवा फाउंडेशनचे तालुका अध्यक्ष गोपाल ईटीवाले यांनी मिथिला दरभंगा सिता मातेच्या पावन भूमीवर आपल्या जिवनातील १६ वा दुर्मिळ रक्तगट निगेटिव रक्तदान केले या रक्तदान शिबिरात सर्वात जास्त महाराष्ट्राच्या रक्तदात्यांनी रक्तदान करून एक दा पुन्हा सिद्ध करून दिले रक्तदान क्षेत्रात महाराष्ट्र १ नंबर ला आहे. महाराष्ट्रात एकनिष्ठा फाउंडेशन करत असलेल्या गौ - सेवा , रक्तसेवा , रुग्णसेवा कार्याची प्रशंसा करत डॉ. मृदुल कुमार शुक्ला , डॉ. सौ. गुंजन त्रिवेदी यांनी दलान रिजार्ट हॉटेल येथे संस्थापक अध्यक्ष सुरजभैय्या यादव , खामगांव तालुका अध्यक्ष गोपाल ईटीवाले यांना राष्ट्रीय सेवारत्न पुरस्कार हारफुल मालार्पण शिल्ड प्रमाणपत्र लाल दुपट्टा देऊन सम्मान करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# उमाळा येथे शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची २५ वी सभा व रब्बी पीक नियोजन शेतकरी मेळावा संपन्न

**जनसंचलन/शेगाव**

आज दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजी कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा अंतर्गत शेतकरी-शास्त्रज्ञ मंचची २५ वी सभा तालुक्यातील उमाळा येथे संपन्न झाली. तसेच रब्बी पीक नियोजन शेतकरी मेळावाही घेण्यात आला. या सभेस प्रमुख उपस्थिती सरपंच (उमाळा) पंडितराव सपकाळ,, बुलढाणा कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अमोल झापे, कृषी संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. दिनेश कानवडे, हवामान शास्त्रज्ञ डॉ. जगदीश वाडकर, कृषी विज्ञान केंद्राचे पशुसंवर्धन विषयतज्ञ मनेश यदुलवार, डॉ. नरेंद्र देशमुख, मंडळ कृषि अधिकारी पी.एम. देशमुख, कृषी सहाय्यक व्ही. के जाधव, कृषी पर्यवेक्षक आर. टी. म्हस्के, तसेच कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा, शेतकरी-शास्त्रज्ञ मंचचे सचिव विजयजी भुतेकर, कृषि संशोधन केंद्र, बुलढाणा- शेतकरी-शास्त्रज्ञमंचाचे सदस्य आणि उमाळा पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विषय तज्ञ कृषि विस्तार शिक्षण डॉ. जगदीश वाडकर यांनी केले. शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची स्थापना, त्यामागची कुलगुरू डॉ. शरदजी गडाख, डॉ.पंदेकृवी, अकोला यांची संकल्पना व सद्यस्थितीत मंचाची ही २५ वी सभा असून याद्वारे प्रत्येक सदस्यांचे शेतीतील अनुभव व शास्त्राज्ञान्द्वारे मिळणारे तंत्रज्ञान याचे महत्व विषद करून मंचातील सदस्यांमार्फत जिल्ह्यातील शेतक-यांपर्यंत तंत्रज्ञानाचा प्रवास जलद व अविरत होत असल्याबाबत माहिती दिली. यावेळी डॉ. अमोल झापे यांनी हरभरा पिकातील बुरशीजन्य रोगाचे व्यवस्थापन व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासंदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.हरभरा पिकांमध्ये बुरशीजन्य रोगामुळे होणारे नुकसान व उत्पादनावर पडणारा फरक याबाबत सविस्तर माहिती देऊन शेतकऱ्यांनी या रोगांचे व्यवस्थापन करण्याबाबत सविस्तर माहिती दिली. शेतकऱ्यांसोबत विविध विषयावर हितगुज करून शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन उपाययोजना सांगितल्या. डॉ. दिनेश कानवडे यांनी तृणधान्य व भरडधान्याचे आहारातील महत्त्व व लागवड पद्धती तंत्रज्ञान बाबत शेतकऱ्यांना माहिती दिली. तृणधान्य व भरडधान्याचे आहारात समावेश करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. यावेळी तृणधान्यांमध्ये असलेल्या अन्नघटकांची सविस्तर माहिती देऊन हे अन्नघटक शरीराला कसे पोषक ठरतात बाबत माहिती दिली. सध्या आपली आहार पद्धती व वाढत्या शारीरिक समस्याबाबत शेतकऱ्यांना अवगत करून तृणधान्य व भरडधान्याचे महत्व पटवून दिले. अवचितराव पालकर यांनी गावकऱ्यांना त्यांच्याकडे असलेल्या पशुधनासाठी मुरघासाचा वापर कशा पद्धतीने करता येऊ शकतो बाबत माहिती दिली. मुरघास कसा तयार करावा, त्याचा वापर केल्यानंतर जनावरांनी मध्ये काय फरक दिसतात व जनावरांसाठी तो कसा उपयुक्त आहे बाबत सविस्तर माहिती दिली. मुरघास तयार करण्यासाठी आवश्यक साधनसामग्री, पद्धती तसेच चारा पिकांची लागवड करून मुरघास तयार करावा जेणेकरून चाऱ्याच्या कमतरतेच्या दिवसांमध्ये व जनावरांना पोषक असा मुरघास तयार करून वापरावा, असे सांगितले. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्यावतीने पी. एम. देशमुखयांनी कृषि विभागामार्फत असलेल्या शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी कशा पद्धतीने घ्यावा त्यासाठी कोणकोणत्या कागदपत्राची पूर्तता करणे आवश्यक आहे व योजनांचा लाभ कशा पद्धतीने शेतकऱ्यांना दिला जातो बाबत सविस्तर माहिती दिली. सर्व तज्ञांचे मार्गदर्शन झाल्यानंतर शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाचे सदस्य हरिभाऊ येवले, गणेश किसन तायडे, अवचितराव पालकर आणि आयोजक म्हणून प्रकाश सपकाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तद्नंतर दुर्गादास सपकाळ यांच्या म्हैस पालन दुग्धव्यवसायास सर्वांनी भेट देऊन व्यवस्थापनाबाबत चर्चा केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद सपकाळ तर प्रकाश सपकाळ यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाशराव सपकाळ आणि ग्रामस्थांनी, तसेच कृषी विज्ञान केंद्रयेथील शास्त्रज्ञांनी प्रयत्न घेतले. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भरारी जितेंद्रजी कायस्थ विभागीय सचिव पदी!

## मराठी पत्रकार परिषदेच्या डिजीटल मिडीयाचा विस्तार..!

### झी २४ तास चे मयूर निकम जिल्हाध्यक्ष!

### -जितेंद्रजी कायस्थ म्हणाले...पत्रकार व जनतेच्या न्यायासाठी कटीबद्ध राहील!

**जनसंचलन/बुलढाणा**

मराठी पत्रकार परिषद संलग्नित डिजिटल मीडिया परिषदेच्या विभागीय सचिव पदी पत्र महर्षी जितेंद्रजी कायस्थ यांची वर्णी लागली तर जिल्हाध्यक्षपदी मयूर निकम व सहसचिवांची जबाबदारी लॉर्ड बुद्धा चॅनलचे जिल्हा प्रतिनिधी दीपक मोरे यांचेवर आली आहे. पत्रकारिता ही विशिष्ट संज्ञा ज्या व्यवहार, वर्तन व कार्याचा बोध करून देते, त्या अर्थाचा व्यवहार मानवी संस्कृतीत फार अलीकडचा म्हणजे गेल्या दोन-अडीच शतकांतील आहे. तशीच अत्यंत जूनी संघटना म्हणून मराठी पत्रकार परिषद विख्यात आहे. पत्रकारांच्या समस्या असो की जनतेवर झालेला अन्याय? ही संघटना न्यायिक लढा देते.अशा मराठी पत्रकार परिषद संलग्नित डिजिटल मीडिया परिषदेची काल जिल्हा पत्रकार भवन येथे डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिलजी वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कार्यकारिणी घोषित करण्यात आली. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या मार्गदर्शनात राज्यात डिजिटल मीडिया परिषदेची मुहूर्तमेढ रोवली. त्याच अनुषंगाने बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या पुढाकाराने पार पडलेल्या बैठकीत बुलढाणा जिल्हा डिजिटल मीडियाच्या विभागीय सचिव पदी जितेंद्र कायस्थ तर बुलढाणा जिल्हा अध्यक्षपदी मयुर निकम, जिल्हा सरचिटणीस पदी दीपक मोरे, उपाध्यक्षपदी किशोर खंदारे तर घाटाखाली जिल्हाध्यक्षपदी श्रीधर ढगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य उपाध्यक्ष अनिल उंबरकर तथा मराठी पत्रकार परिषदेचे नवनियुक्त राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे, बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंह राजपूत, जिल्हा सरचिटणीस कासीम शेख, जिल्हा कार्याध्यक्ष वसीम शेख, तर पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे समन्वयक राजेश डीडोळकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत डिजिटल मीडिया परिषदेच्या नियुक्त्या करण्यात आल्या. यावेळी जिल्हाभरातील युट्युब चॅनलचे संपादक पोर्टल चे संपादक व पत्रकार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बुलढाणा जिल्हा डिजिटल मीडिया परिषदेच्या इतर



कार्यकारणी पुढील दोन दिवसात घोषित करण्यात येणार असल्याची माहिती नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी दिली आहे. पत्रकारांसाठीच नव्हे तर जनतेच्या न्यायासाठी तत्पर! केवळ पत्रकारांनाच नव्हे तर जनतेला न्याय देण्यासाठी मी ठाम आहे. विभागीय सचिव पदाची जबाबदारी आल्याने डिजिटल मीडिया बळकट करण्यासाठी मी कार्यतत्पर राहील असा विश्वास, यावेळी जितेंद्रजी कायस्थ यांनी व्यक्त केला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958